साक्षीदार क्र. १

**उलटतपास आरोपीकरीता ॲड. प्रसाद पांचाळ यांचेतर्फे :—**

**शपथेवर सुरु:—**

५. मी माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर म्हणजे १९८२ पासून भाडेकरु राहत असलेल्या बिल्डींगचे भाडे वसूलीकरणे व इतर काम पाहू लागलो. हे म्हणणे खरे आहे की, भाडेकरुंकडून प्रतिमहिन्याचे भाडे हे रेन्ट कलेक्टर वसूल करत असे. हे म्हणणे खरे आहे की, भाडे वसूल करण्यासाठी श्री. मापल सिंग यांना रेन्ट कलेक्टर म्हणून नेमलेले होते त्यामुळे भाडेकरुंच्या बिल्डींगला तेच नेहमी भेट देऊन त्याबाबतची वस्तुस्थिती मला सांगत असत. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर वादांकित रुम नंबर १४ मध्ये सन २००४ पर्यंत प्रत्यक्षात रुममध्ये कोण राहत आहे याची माहिती मला होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ मध्ये सर्वप्रथम मला श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर यांच्या ताब्यात वादांकित रुम नंबर १४ असल्याची माहिती मला समजली. (साक्षीदाराने स्वत:हून असे सांगितले की, श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर यानेच सन २००४ मध्ये भेटून त्यांना स्वत:ची ओळख करुन दिली व तो सखाराम आंटा नसल्याचे सांगितले.) मला माझ्या रेन्ट कलेक्टरने कधीही श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर हा मूळ भाडेकरु सखाराम आंटासबोत राहत आहे अशी माहिती सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर हा माझ्या रेन्ट कलेक्टरकडे महिन्याचे भाडे जमा करत असे. (साक्षीदाराने स्वत:हून असे सांगितले की, भाडेपावती ही मूळ भाडेकरु सखाराम आंटा याच्या नावे दिली जात असे.) हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ मध्ये श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर यांच्या विरुध्द मी कुठल्याही सक्षम दिवाणी न्यायालयामध्ये दाद मागितली नाही. (साक्षीदाराने स्वत:हून असे सांगितले की, श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर हे त्यांना भेटले होते व त्या वेळी ते एकटेच राहत होते. त्यामुळे त्यांनी तेथे राहण्याची त्यांनी याचना केली. त्यावेळी त्यांना मूळबाळ नसल्याचे सांगितले होते. त्यामुळे केवल मानवतेच्या

कारणासाठी तात्काळ कुठलीही कारवाई केली नव्हती.) हे म्हणणे खरे नाही की, सन २००० मध्ये मूळ भाडेकरु श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर यांच्या पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर आरोपी हे रुम नंबर १४ मध्ये राहू लागले याची मला वैयक्तिक माहिती होती. सन २००० ते २००४ या कालावधीमध्ये रुम नंबर १४ मध्ये कोण राहत होते याची मला वैयक्तिक माहित होती. माझ्या माहितीप्रमाणे रुम नंबर १४ मध्ये सदरील कालावधीमध्ये फक्त श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर हे राहत होते.

६. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ पर्यंत रुम नंबर १४ मध्ये मूळ भाडेकरु सखाराम आंटा राहत होते या भ्रमामध्ये मी होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ मध्ये सदरील जागेमध्ये श्रीधर अप्पा मेस्त्री उर्फ श्रीधर असोलकर राहतात ही बाब माझ्या लक्षात आली.

**(साक्षीदार हे ७४ वर्षाचे ग्रहस्थ आहेत. त्यामुळे वयोमानानुसार थोडा त्रास होत असल्याने उलटतपास तहकुब करावा अशी सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या मार्फत विनंती केली. सबब, उलटतपास हा दिनांक ०६.१२.२०२५ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे. )**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : २९/११/२०२५.**